सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**वनविभाग**
**मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे, वनवृत्त ठाणे, यांचे कार्यालय**
वन भवन, मायक्रो वेव्ह टॉवर, बारा बंगला एरिया, कोपरी कॉलनी ठाणे (पूर्व), पिन- 400 603
**दुरध्वनी क्रमांक** - 022- 25329865
**Email: estccfthane@gmail.com**

# प्रसिध्दिपत्रक

**दि.१३.०३.२०२४**

वनरक्षक (गट-क) या पदाकरीता अंतिम निवडसुची व प्रतिक्षा यादी प्रादेशिक निवड समितीच्या मान्यतेने वनविभागाचे **https://mahaforest.gov.in** या संकेतस्थळावर दिनांक १२.०३.२०२४ रोजी प्रसिध्द करणेत आली आहे.

२.०० वनरक्षक हे वनविभागातील आघाडीचे पद असून त्यांना वनक्षेत्रात पायी गस्त करावी लागते. त्यामुळे वनरक्षक हे शारीरीकदृष्टया सदृढ असणे आवश्यक आहे. करिता **वनरक्षक पदासाठी ४ तासात पुरुष उमेदवारांना २५ कि.मी. व महिला उमेदवारांना १६ कि.मी. चालण्याची शारीरिक क्षमता चाचणी विहित करणेत आलेली आहे**. त्याअनुषंगाने, निवडसूचीतील (निवड यादी व प्रतीक्षा यादी) पुरूष उमेदवारांकरिता ४ तासामध्ये २५ कि.मी. अंतर चालणे व महिला उमेदवारांकरीता ४ तासांमध्ये १६ कि.मी. अंतर चालणे अशी चालण्याची शारीरिक तग धरण्याची चाचणी (Stamina test) **सोमवार दिनांक १८ मार्च, २०२४ रोजी सकाळी ६.०० वा. संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली** (पूर्व), मुंबई या ठिकाणी आयोजीत करणेत येत आहे. शारीरिक क्षमता चाचणीव्दारे पुरूष उमेदवारांना २५ कि.मी. व महिला उमेदवारांना १६ कि.मी. अंतर उमेदवारांनी चालून किंवा धावून किंवा चालून व धावून जास्तीत जास्त ४ तासात पूर्ण करणे आवश्यक आहे. **जे उमेदवार सदर चालचाचणी ४ तासांच्या आत पूर्ण करू शकणार नाहीत, ते भरती प्रक्रियेतून बाद ठरतील.**

३.०० शारीरिक क्षमता चाल-चाचणीसाठी येणा-या उमेदवारांनी ऑनलाईन परिक्षेचे प्रवेशपत्र, स्वतःची ओळख पटविण्यासाठी आधारकार्ड/पॅनकार्ड/मतदान ओळखपत्र/वाहन चालक परवाना यापैकी एक मुळ ओळखपत्र तसेच चाल-चाचणी करिता शारीरिकदृष्टया सदृढ असल्याबाबत **शासकीय वैद्यकीय अधिकारी यांचेकडील वैद्यकीय प्रमाणपत्र (सोबतच्या परिशिष्ट अ प्रमाणे)** व **स्वतःचे वचनपत्र (सोबतच्या परिशिष्ट ब प्रमाणे) सादर करणे आवश्यक राहील. सदर दोन्ही प्रमाणपत्र सादर केलेल्या उमेदवारांनाच शारीरिक क्षमता चाचणीसाठी प्रवेश देण्यात येईल, खाजगी वैद्यकीय अधिकारी यांचेकडील वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणा-या उमेदवारांना शारीरिक क्षमता चाचणीसाठी प्रवेश दिला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी**.

४.०० निवडसूचीतील (निवड यादी व प्रतिक्षा यादी) जे उमेदवार सोमवार दिनांक १८ मार्च, २०२४ रोजी सकाळी ६.०० वा. - संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली या ठिकाणी चालण्याची शारीरिक क्षमत्ता चाचणीसाठी वेळेवर उपस्थित होणार नाहीत किंवा गैरहजर राहतील अश्या उमेदवारास पुनश्चः संधी मिळण्याचा हक्क राहणार नाही व ते भरती प्रक्रियेतून बाद समजण्यात येईल.

शारीरिक क्षमता चाचणीचे ठिकाण : **संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली (पूर्व), मुंबई**

ठिकाण:- ठाणे
दिनांक:-१३.०३.२०२४

(संतोष सस्ते)

**सदस्य सचिव**
**प्रादेशिक निवड समिती**
**तथा**
**उप वनसंरक्षक (प्रा.) ठाणे**

## परिशिष्ट - अ

### वनरक्षक भरती प्रक्रिया सन २०२३

### शारिरिकदृष्ट्या सुदृढ असलेबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र

उमेदवारांचा पात्र यादीतील अनुक्रमांक ------------------------------------------------

उमेदवारांचे संपूर्ण नाव - ---------------------------------------------------

पदाचे नाव - वनरक्षक (गट-क)

| उमेदवारांचा अलिकडील कालावधीतील रंगीत पासपोर्ट साईज फोटो व फोटोवर वैद्यकीय अधिकारी यांची क्रॉस सिग्नेचर |
|---|

प्रमाणित करणेत येते की, श्री./कु. ------------------------------------------------------------ हे पुरूष उमेदवाराकरीता २५ कि.मी. / महीला उमेदवाराकरीता १६ कि.मी. चालण्यासाठी शारीरिक दृष्ट्या सुदृढ आहेत.

दिनांक :-

ठिकाण :-

शासकीय वैद्यकीय अधिकारी

(स्वाक्षरी व शिक्यासह)

टीप- केवळ शासकीय वैद्यकीय अधिकारी यांचे सहीशिक्यासहीतचे वैद्यकीय प्रमाणपत्र स्वीकारले जाईल.

परिशिष्ट - ब

## वनरक्षक पदाच्या उमेदवाराने चाल चाचणीस शारिरिकदृष्ट्या सुदृढ असल्याबाबतचे द्यावयाचे वचनपत्र

वनरक्षक भरती २०२३ मध्ये मी खालील सही करणार वचनपत्र लिहुन देतो / देते की, वनरक्षक पदभरती २०२३ मध्ये मी उमेदवार म्हणून आवेदन पत्र दाखल केले आहे. उपरोक्त भरती प्रक्रियेचा भाग म्हणून शारिरीक क्षमता चालचाचणीमध्ये २५ कि.मी. अंतर (पुरुष उमेदवारांस) व १६ कि.मी. अंतर (महिला उमेदवारांस) ४ तासामध्ये पूर्ण करावयाच्या धाव चाचणीमध्ये स्वेच्छेने सहभागी होत आहे. सदरहु चाल चाचणीकरीता मी शारिरीकदृष्टया सक्षम आहे आणि त्या संबंधात शासकीय वैद्यकीय अधिकारी यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र सोबत जोडले आहे. सदर शारिरीक क्षमता स्पर्धात्मक चालचाचणी दरम्यान माझी शारिरीक वा कोणत्याही प्रकारची हानी झाल्यास यास शासन जबाबदार राहणार नाही.

मी आणखी असे जाहीर करतो / करते की, वरीलप्रमाणे दिलेली माहितीखोटी अगर चुकीची आढळल्यास मिळालेली नोकरी गमावण्यास मी बांधील राहील व त्याबद्दल माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. तसेच, वरीलप्रमाणे दिलेली माहितीखोटी अगर चुकीची आढळल्यास माझ्यावर फौजदारी गुन्हा दाखल करणेस माझी कोणतीही हरकत राहणार नाही.

करीता वचनपत्र लिहुन देत आहे.

दिनांक :-

स्थळ :-

उमेदवारांची स्वाक्षरी

पुर्ण नांव :- ---------------------------------------------

पत्ता :- ---------------------------------------------

---------------------------------------------